ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.XII/June 2012pp.1-4

Research Paper

# कौटुंबिक हिंसा

*प्रा.डॉ. ए. व्ही. कुलकर्णी*
समाजशास्त्र विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता. जि. बीड.

## *प्रस्तावना :–*

हिंसाचाराचे मुळ मूलतः सत्ता अधिकारात लपलेले आहे. कुटुंबात स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेमागे अनेक कारणे आढळून येतात. लग्नात होणाऱ्या वारेमाप खर्चातून चंगळवादी संस्कृती रूजविली जात आहे. हुंडा असो किंवा विवाहावरील खर्च असो, प्रतिष्ठा जपण्यासाठी स्पर्धा वाढत आहे."

***पुरूष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व :–***

पुरूष प्रधान संस्कृती आपल्याकडे परंपरेने रूढ झाली आहे. सुशिक्षित असो वा अशिक्षित स्त्रियांमध्ये 'स्व' ची जाणीव मुळातच होऊ दिली जात नाही. समाजात आणि कुटुंबातही पारंपारिक समजूतीतून स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली होती व आहेत. 'स्त्री ही गौण आहे, दीन आहे आणि हीन ही' असे समजून त्यांना वागविले जाते.

मनूने स्त्री जन्म तिरस्कार वाटेल असा केल्यामुळे आधुनिक काळात, त्याही पेक्षा 21 व्या शतकातसुध्दा मुलींचा जन्म नकोसा वाटतो. एवढेच नाही तर त्यांना गर्भातच संपविले जाते.

स्त्रियांवरील हिंसाचार ही खाजगी बाब न राहता तिच्यावर झालेल्या अन्याय, अत्याचाराला भारतीय दंड संहितेत इतर गुन्ह्यासारखे पाहिले पाहिजे. गर्भलिंग हत्या, स्त्रीभ्रूण हत्येमुळे स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. एकीकडे देवी म्हणून तिची पुजा केली जाते त्याच संस्कृतीत मुलीला तिच्या जन्माअगोदरच संपविले जाते. हे भ्रूण हत्येचं प्रमाण सामान्य व्यक्तीपासून ते उच्चवर्णीय, उच्च आर्थिक गटांमध्ये घडून येत आहे.

स्त्री ही विकृती नसून निसर्गप्रकृती आहे, ती पुरुषांपेक्षा वेगळी आहे पण दुबळी नाही हे लक्षात घेतलं पाहिजे.

***हिंसाचाराचे स्वरुप–शारीरिक, मानसिक :–***

शस्त्रियांचा शारीरिक व मानसिक छळ करुन अमानवी वृत्तीची परिसीमा गाठली जाते. या अत्त्याचाराचा शेवट हा आत्महत्त्येत होतो अथवा तिला ठार मारले जाते. जेवायला न देणे, अंगावर धाऊन जाणे, स्त्रियांच्या चेहऱ्यावर ॲसीड टाकणे, चटके देणे, भिंतीवर डोके आपटणे, घराबाहेर पडल्यानंतर रस्त्याने चालतांना पुरुषाच्या मागे विशिष्ट अंतरावर खाली मान घालून चालण्याची सक्ती करणे असे विविध प्रकार शारीरिक अत्त्याचारात येतात.

सतत संशय घेणे, अपमानित करणे, मुलांपासून दूर करण्याची भिती दाखविणे, इतर स्त्रियांबरोबर तुलना करणे, चारित्र्यावर संशय घेणे, इ. शारीरिक छळाबरोबर मानसिक विकृतीतून ही छळ होतो. पती–पत्नी हे एकमेकांवर वर्चस्व गाजविण्याच्या भूमिकेतून माझे स्थान तुझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे, या भावनेतून जाणीव करुन दिली जाते. हिंसाचाराचा स्त्रियांच्या मानसिकतेवर, व्यक्तीमत्त्वावर परिणाम होतो. या सर्व प्रश्नांच्या मुळाशी लिंगभेदावर आधारीत मानसिकता हे मुळ कारण आहे. संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन केंद्र कुटुंबाची संख्या वाढत आहे. अशावेळी पती–पत्नी यांना समजावून सांगणारी व्यक्ती घरात असत नाही याचे दुष्परिणाम अनेक कुटुंबावर जाणवतात.

अशिक्षित असो वा सुशिक्षित स्त्री दोघींच्या पुढे या कौटुंबिक हिंसेतून दोनच पर्याय उरतात. 1) स्वतःला संपविणे 2) समोरच्या व्यक्तीस संपविणे.

कुटुंबातील सदस्याच्या विविध पध्दतीच्या वर्तनातून महिलांवर अत्त्याचार होतात. त्याचबरोबर स्त्री पुरुषांना शरीरसंबंधाबाबतच्या असलेल्या अज्ञानातून स्त्रियांना बळी पडावे लागते. पती पत्नीतील शरीरसंबंधाबरोबरच दोघांमधील संशयी स्वभावामुळे संबंध बिघडतात. पुरुषांना व स्त्रियांना या बाबत असलेले मापदंड वेगवेगळे असतात. आपल्या पतीचे इतर स्त्री अथवा स्त्रियांशी शरीर संबंध आहेत, ही घटना त्या स्त्रीच्या दृष्टीने भयानक आहे. हे सर्व कुटुंबातील इतर सदस्यांना माहित असताना व स्वतः त्या अनुभवल्यानंतर पुन्हा त्या व्यक्तीबरोबरच मरेपर्यंत जगायचे ही फार मोठी शिक्षा तिला भोगावी लागते.

विवाहीत स्त्रियांना मुलीच झाल्या, मुलगा झाला नाही त्या कारणावरुन अत्त्याचार केला जातो. त्या स्त्रीवर नवस, बुवाबाजी, अघोरी उपाय 'मुलगा' व्हावा म्हणून केला जातो. अशिक्षित कुटुंबातून आलेल्या स्त्रिया काही प्रमाणात या सर्व जाचाला सहन करतात.

विधवा तरुण स्त्रियांची अवस्था अतिशय वाईट आहे. अशा स्त्रियांना तर जनावरासारखे वागविले जाते. तिचा चेहरा पाहणे अपशकून समजले जाते. सासरी कुणाचा आधार नसेल तर तिची वाईट अवस्था होते. विधवा स्त्रियांना आजही पुनर्विवाह करण्यास मनाई आहे. विधवा स्त्री जर तरुण असेल तर तिचा छळ केला जातो. चार भिंतीच्या आत या स्त्रियांचा कोंडमारा भयावह असतो. कुटुंबातील सर्व सदस्यांचे त्या स्त्रीबरोबरचे संबंध वेगवेगळ्या प्रकारचे असतात. काही संबंध वर्जित असतात तर काही संबंधांना सामाजिक मान्यता असते. परंतु याचाही वेगळा अर्थ घेऊन तिच्यावर अनैतिक संबंध ठेवले जातात. मारहाण केली जाते. पतीचा आधार ही तिला अशावेळी मिळत नाही. अशा स्वैर संबंधाला पारंपारिक कुटुंबातच नव्हे तर आधुनिक काळात मान्यता असते. हे जरी असले तरी याचा बळी तिलाच पडावे लागते.

***स्त्रियांवर होणाऱ्या अत्त्याचारासाठी खालील पाच घटक महत्त्वाचे आहेत –***

1. सामाजिक परिस्थिती (वय, शिक्षण)
2. सहकार्य मदतीची पातळी (कुटुंबातील सदस्य, लग्नानंतर झालेले नातेवाईक)
3. इतरांच्या अपेक्षा (पती, नातेवाईक, मुले, कार्यालयातील सहकारी)
4. आर्थिक पाया (अल्प, मध्यम, उच्च उत्पन्न गट)
5. स्वतःची ओळख (प्रतिमा) (भित्री, लाजाळू, कमकुवत, बरोबरीची, खंबीर, धाडसी)

स्त्रियांवर होणाऱ्या अत्त्याचारासाठी बळी पडलेल्या स्त्रियांची स्वभाव वैशिष्ट्ये व सामाजिक वातावरण महत्त्वपूर्ण ठरते. याचाच अर्थ स्त्रियांवरील अत्त्याचार, बलात्कार, मारहाण, हुंड्यासाठी छळ, वेश्या व्यवसाय करण्यासाठी पळवून नेणे या घटना तेव्हाच घडतात जेव्हा ती स्त्री दुबळी असते, असहाय्य असते.

कुठलीही स्त्री समाजात वावरत असताना तिचा विविध प्रकारच्या व्यक्तीशी संबंध येतो. प्रत्येकाचा हेतू आणि अपेक्षा वेगवेगळ्या असतात. स्त्रियांवरील अत्त्याचार हे तिचा

**Please cite this Article as :** *प्रा.डॉ. ए. व्ही. कुलकर्णी*, *कौटुंबिक हिंसा* **: Golden Research Thoughts (June ; 2012)**

दर्जा, भूमिका आणि तिची इच्छा, पात्रता व तीने अत्त्याचार सहन न करता केलेल्या प्रयत्नांवर अवलंबून आहे.

***उपाययोजना :–***

1) स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे.
2) पती–पत्नीमध्ये सामंजस्य व विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे.
3) महिलांचा विकास व सबलीकरणाच्या दृष्टीकोनातून शासकीय व गैरसरकारी संघटनामार्फत प्रयत्न अधिक सक्षम पध्दतीने व्हायला हवेत.
4) स्त्रियांनी मौन पाळण्यापेक्षा व्यक्त होण्यास शिकले पाहिजे.
5) स्त्री पुरुष विषमतेला खतपाणी घालणारी मानसिकता व व्यवहार बदलणे आवश्यक आहे.
6) अन्यायाबद्दलचा आक्रोश संयमित व सौम्य ठेवता येईल जेव्हा समाज आंधळा, बहिरा नसेल, संपूर्ण समाजाची संवेदनक्षमता अधिक तीव्र होणे गरजेचे आहे.
7) आधुनिक स्त्रीला सक्षम करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटाचे जाळे तयार झाले आहे. याचा उद्देश केवळ आर्थिक व्यवहारापूरता मर्यादित न राहता सामाजिक व राजकीय उपक्रमाशी जोडला गेला आहे.
8) आत्मविश्वासाने अर्थपूर्ण जगण्यासाठी स्त्रियांनी अर्थार्जन करणे गरजेचे आहे.
9) हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. दारु पिऊन धिंगाणा करणे, बायकोला मारणे, यात काय वेगळं ध नवरा बायकोला मारतो तो त्याचा हक्क आहे आणि सहन करणे हा आपला धर्म आहे, ही स्त्रियांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.
10) अत्त्याचार पीडित महिलेने कांगावा केल्याचा आरोप केला जातो. आपण सहन केलेच पाहिजे ही वृती स्त्रियांमध्ये बळावते. कायद्याने दबाव येतो. महिलांनी बोललं पाहिजे तरच त्या या समस्येचा प्रतिकार करु शकतील.
11) वृत्तपत्र, आकाशवाणी, दुरदर्शन, चित्रपट, पारंपारिक लोककला इ. माध्यमांद्वारे स्त्रियांवर होत असलेल्या अत्त्याचारासंबंधी शासन व स्वयंसेवी संस्थांच्या भूमिकांवर योग्य प्रकारे प्रकाश टाकणे.
12) सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे व्यवस्थेत सुधारणा आवश्यक आहे.
13) स्वतः, स्वतःचे कुटुंब आणि सामजिक सुधारणा याचा पाठपुरावा सुशिक्षित स्त्रीने करायचा ठरविला तर कौटुंबिक अत्त्याचाराच्या प्रमाणास आळा बसू शकेल.

भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना स्वातंत्र्य, समता, न्याय व समान हक्क प्रदान केले आहेत. वैदिक काळात स्त्रियांना शिक्षण, धर्म, राजकारण व संपत्ती इ. बाबत मुभा होती. स्त्रियांशिवाय पुरुषाचे जीवन अधुरे होते. उत्तर वैदिक काळापासून ते आजपर्यंत विविध स्वरुपात स्त्रियांना दुय्यम दर्जा दिलेला आहे. आज स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रीचा पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहेत.

राजकारणात स्त्रियांना 50 टक्के आरक्षण दिले आहे पण इथेही स्त्रिया निवडून येत असल्या तरी सगळा कारभार पुरुषांकडेच असतो. कायदे असले तरी त्याचा वापर स्त्रियांना करता येत नाही. परंतु परिस्थितीला 'शरण जाणे' हा प्रकार अधिक आढळतो.

स्त्रीभ्रूणांनी यानंतर 'जन्मू द्या, वाढू द्या, माणूस म्हणून जगू द्या' अशी अपेक्षा बाळगली आहे.

***संदर्भ :–***

***1)गिताली वि मं, (2009)*** – स्त्री प्रश्न सोडविताना
***2)क्रांती अग्नीहोत्री डबीर, (2009)*** – कौटुंबिक हिंसाचार
***3)डॉ. देशपांडे संज्योत, (2009)*** – हिंसाचार व स्त्रियांचे मानसिक आरोग्य
***4)कांबळे उत्तम, (08.03.2012)*** – मौन पाळण्यापेक्षा व्यक्त होणे शिका – दै. सकाळ
***5)सारस्वत स्वप्नील, (2005)*** – महिला विकास : एक परिदृष्य
***6)गुप्ता कमलेशकुमार, (2005)*** – महिला सशक्तीकरण
***7)डॉ. काळदाते सुधाताई, (2005)*** – भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या
***8)आहूजा राम, (1997)*** – सोशल प्रॉब्लमस इन इंडिया

**Please cite this Article as :** *प्रा.डॉ. ए. व्ही. कुलकर्णी, कौटुंबिक हिंसा* **: Golden Research Thoughts (June ; 2012)**